**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील “प्रशिक्षण समन्वयक (IT)” या पदाचे स्थानांतरण/रुपांतर “योजना समन्वयक” या पदामध्ये करणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

### ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२५/प्र.क्र.८९/योजना-१०

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई-४०० ००१.

तारीख: ११ सप्टेंबर, २०२५.

**वाचा :-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि. ०२.०६.२०१५.
२) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.२०१५/प्र.क्र.२४०/यो-१०, दि.१६.०७.२०१५.
३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/यो-१०, दि.१०.०२.२०१६.
४) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१७/प्र.क्र.५९/यो-१०, दि.२७.०६.२०१७.
५) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१९/प्र.क्र.३६/यो-१०, दि.१७.०६.२०१९.
६) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.१९/यो-१०, दि.२०.०५.२०२१.
७) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२३/प्र.क्र.२३२/यो-१०, दि.२१.०२.२०२४.
८) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.१९/यो-१०, दि.२७.०९.२०२४.
९) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२५/प्र.क्र.८९/यो-१०, दि.२६.०६.२०२५.

**प्रस्तावना:-**

राज्यातील ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी दिनांक १६.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या राज्य व्यवस्थापन कक्ष- इंदिरा आवास योजना ची व्याप्ती वाढवून दिनांक १०.०२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षात रुपांतरीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण करिता कंत्राटी व प्रतिनियुक्तीची पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच, राज्य व्यवस्थापन कक्षाचा वाढलेल्या कामाचा व्याप विचारात घेऊन, दिनांक २७.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध कंत्राटी स्वरूपाची अधिकची पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच, दिनांक २७.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर कंत्राटी स्वरुपाच्या पदांच्या मानधनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाजाचे तसेच योजनेशी निगडीत असलेल्या कामाचे स्वरूप विचारात घेता, केंद्र व इतर राज्य पुरस्कृत योजनांकरीता लेखा, अतिक्रमण/PDU व बांधकाम इत्यादी कामकाजासाठी मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली आहे.

उपरोक्त कामकाजाच्या अनुषंगाने राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण च्या राज्यस्तरीय कार्यालयामध्ये मनुष्यबळ आवश्यक असल्याने, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या आस्थापनेवरील प्रशिक्षण समन्वयक (IT) या पदाचे स्थानांतरण/रुपांतर करुन पदनामात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या आस्थापनेवरील प्रशिक्षण समन्वयक (IT) या पदाचे स्थानांतरण / रुपांतर योजना समन्वयक या पदामध्ये करण्यास सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे. योजना समन्वयक या पदाच्या कामकाजाचे स्वरुप, कर्तव्य व जबाबदाऱ्या परिशिष्ट-ब प्रमाणे असतील.

२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.०१ येथील दिनांक ०२.०६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. “योजना समन्वयक” (बाह्य यंत्रणेद्वारे) या पदाच्या मानधनामुळे उद्भवणारा खर्च केंद्र शासन पुरस्कृत तसेच राज्य शासन पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या प्रशासकीय खर्चाच्या निधीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१०१३०३२१०४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARSHA M BHAROSE

Digitally signed by VARSHA M BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2F3096A175796CC670522C4AFF97DA20B708981B5122E87C8346C4CC7468F821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA M BHAROSE
Date: 2025.09.11 10:37:44 +05'30'

**व.मुं.भरोसे**
सह सचिव**,**महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव.

३. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव.
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
८. मा. सर्व पालकमंत्री तथा मंत्री यांचे खाजगी सचिव.
९. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/आदिवासी विकास/गृहनिर्माण विभाग.
११. सर्व विभागीय आयुक्त.
१२. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.
१३. समाज कल्याण आयुक्त, पुणे.
१४. कामगार आयुक्त, मुंबई.
१५. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय.
१६. सर्व जिल्हाधिकारी.
१७. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, मुंबई.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
२०. सर्व कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२१. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
२२. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय.
२३. अवर सचिव, योजना- १०, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
२४. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.
२५. सर्व सरपंच, ग्रामपंचायत.
२६. निवड नस्ती.

(शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२५/प्र.क्र.८९/योजना-१०, दि. १० सप्टेंबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट)

## परिशिष्ट -अ

| पदाची सद्य:स्थिती | | | | समायोजन करुन स्थानांतरण/रुपांतर करावयाचे पद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| पदनाम | पद संख्या | नियुक्ती प्रकार | वेतन /मानधन (रुपये) | पदनाम | पद संख्या | पदाची अर्हता | मासीक एकत्रीत मानधन (रुपये) | नियुक्तीचा प्रकार | कामकाजाचे स्वरुप व जबाबदाऱ्या |
| प्रशिक्षण समन्वयक (IT) | ०६ | बाह्य यंत्रणेद्वारे | ७२,९३० | योजना समन्वयक | ०३ | १.पदाच्या कामकाजाच्या अनुषंगाने संबंधित शाखेतील पदवीधर/ पदविका.<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक (MS-OFFICE), TALLY/Web Development Course/Dot Net/React इ.<br>३. ग्रामविकास व ग्रामविकास विभागाशी संलग्न क्षेत्रात कामाचा कमीत कमी ०५ वर्षांचा अनुभव. | ७२,९३० | बाह्य यंत्रणेद्वारे | परिशिष्ट-ब प्रमाणे |

**(शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२५/प्र.क्र.८९/योजना-१० दि. १० सप्टेंबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट)**

**परिशिष्ट -ब**

| पदनाम | कामकाजाचे स्वरूप, कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|
| योजना समन्वयक | **लेखा :**<br>१. कोषागार कार्यालयात सादर करण्यात आलेल्या निधीच्या देयकांवर आक्षेप नोंदविल्यास संबंधित योजनांच्या विभागांशी समन्वय साधून आक्षेपांची पुर्तता करणे.<br>२. योजनांच्या अंमलबजावणीकरीता लागणारा प्रशासकिय निधी व कार्यक्रम निधीची मागणी केंद्र शासन व योजनांच्या संबंधित आवश्यक माहिती तयार करणे व त्याबाबत पाठपुरावा करणे.<br>३. Accountant General (A & E)-I, Maharashtra, Mumbai यांच्याशी समन्वय साधून योजनांकरीता प्राप्त निधीचे Reconciliation करणे.<br>४. विनियोजन लेखे अहवालातील महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेल्या परिच्छेद/आक्षेपांबाबत AG कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संपर्क करून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने व अंतिम सुधारीत अनुदान (FMG) याबाबतची माहिती सहाय्यक संचालक (लेखा) यांना सहाय्यक लेखाधिकारी मार्फत सादर करणे.<br>५. राज्य संचालनालय, महाराष्ट्र येथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून व वेळोवेळी पाठपुरावा करून राज्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व घरकुल योजना PFMS प्रणालीशी संलग्न करुन घेणे.<br>६. वित्तीय अधिकाराच्या अधीन राहून कार्यालयाशी संबंधित खरेदी प्रक्रिया करणे. तसेच E-Tender व Gems प्रणालीवरून वस्तू व सेवा खरेदी करणे इत्यादी कामकाज सादर करणे.<br>**अतिक्रमण/ PDU:**<br>१. ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे कार्यक्रमाचे राज्यस्तरावरुन सनियंत्रण करणे.<br>२. अतिक्रमणे नियमानुकूल बाबत शासनाशी व जिल्हातील यंत्रणांशी समन्वय साधून योजना राबविणे.<br>३. ग्रामीण भागातील अतिक्रमणे नोंदीसाठी विकसित केलेल्या संगणक प्रणालीचे संपूर्ण सनियंत्रण करणे.<br>४. ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे व प्रभावी अंमलबलावणीसाठी जिल्हा, तालूका व ग्रामपंचायत स्तरापर्यंत मार्गदर्शन करणे.<br>५. ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणेकरिता राज्यस्तरीय व विभागस्तरीय कृतीदल (Task Force) बैठकीचे कामकाज सांभळणे.<br>६. ग्रामीण भागातील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे संदर्भातील विधान परिषदेमध्ये उपस्थित झालेले लक्षवेधी सूचना व विधानसभा अधिवेशनात उपस्थित झालेले तारांकीत प्रश्न, अतांरांकीत प्रश्न याची माहिती सादर करणे.<br>**बांधकाम:**<br>१. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण राबविणे<br>२. घरकुलांमध्ये गुणवत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञान आणण्याच्या दृष्टीने- "ग्रामीण गृहनिर्माण अभियंता" संकल्पना राबविणे आणि समन्वय करणे.<br>३. ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत पूर्ण घरकुलांवर योजनेचे परिचय चिन्ह (लोगो) लावणेबाबत कार्यवाही.<br>४. डोंगरी क्षेत्र संबंधित प्राप्त होणाऱ्या सर्व पत्रांवर कार्यवाही करणे.<br>५. MGNREGA संबंधित प्राप्त होणाऱ्या सर्व पत्रांवर कार्यवाही करणे.<br>६. विशेष प्रकल्प अंतर्गत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करणे. |